कला अकादमी गोवा
पणजी-गोवा
कअ/काविवि/रा.म.भ स्प./२०२३-२४/१८८
दि. ०९/०८/ २०२३

# कृपया प्रसिध्दीसाठी

कला अकादमी आयोजित पं.मनोहरबुवा शिरगांवकर स्मृती पुरुष कलाकारांच्या राज्यस्तरीय भजन स्पर्धा मंगळवार दि १५ ऑगस्ट २०२३ रोजी सकाळी १०.०० वाजता साखळी येथील रविंद्र भवनच्या पं. मनोहरबुवा शिरगांवकर साभागृहात आयोजित करण्यात आली आहे.

सदर स्पर्धेला जोडून सायंकाळी बाल, महिला व परुष कलाकारांच्या विभागीय व राज्यस्तरीय स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ होणार आहे.

**स्पर्धांचा सविस्तर कार्यक्रम खाली देण्यात आला आहे.**

**पुरुष कलाकार**

श्री सातेरी केळबाय कला आणि सांस्कृतीक मंडळ, लाडफे-डिचोली, श्री आजोबा कल्चरल असोसिएशन, केरी-सत्तरी, शिवदामोदर भजनी मंडळ, फातोर्डा-मडगांव, स्वरब्रम्ह संगीत सांस्कृतिक संस्था, एलमॉन्त-वास्को, श्री महापुरुष संस्था, बांदोळवाडा-पेडणे, दाडेश्वर मुळवीर कला आणि सांस्कृतिक मंडळ, अमईवाडा, विर्नोडा-पेडणे, श्री भगवती चिंबलकरीण भजनी मंडळ, चिंबल-तिसवाडी व श्री लक्ष्मी भजनी मंडळ, सावयवेरे-फोंडा या पथकांचा समावेश आहे.

सदर राज्यस्तरीय स्पर्धांच्या आयोजनासाठी रविंद्र भवन, साखळी यांचे सक्रिय सहकार्य लाभले आहे. या स्पर्धांमध्ये सहभागी होणा-या सर्व पथकांनी आपल्या स्पर्धेच्या दिवशी सादरीकरणाच्या किमान १ तास अगोदर पुर्वतयारीसह उपस्थित राहाणे आवश्यक असून स्पर्धेचा अनुक्रम चिठ्ठया टाकून ठरविण्यात येईल व तो सर्वांवर बंधनकारक राहील. सादरीकरणाचा अनुक्रम न पाळणा-या पथकांना भजन सादर करु दिले जाणार नाही व सदर पथक स्पर्धेतून बाद ठरविण्यात येईल याची सर्व पथकांनी नोंद घ्यावी. तरी भजनप्रेमी रसिकांनी राज्यस्तरीय भजन स्पर्धेला मोठया संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन कला अकादमीने केले आहे.

(श्री. प्रदीप गांवकर)
कार्यक्रम व विकास अधिकारी

प्रति

१. गोमंतक २. नवप्रभा ३. तरुण भारत ४. पुढारी ५. लोकमत

६. दै. हेराल्ड ७. गोवनवार्ता ८. आकाशवाणी पणजी केंद्र ९. दै. भांगरभूंय

एसझेड/एसएस